बदलापूर नगरपालिका परिषद, बदलापूर

292-3C

जावक क्रमांक/बनपा/नरवि/बां. प.

बदलापूर नगरपालिका कार्यालय, बदलापूर

दिनांक १४/६/९५

श्री/श्रीमती बद्रीराम कृष्णा लाड व इतर बारा यांचे

कु.मु.प.श्री. श्री. राजीव बद्रीराम लाड

द्वारा - श्री. सतीश ओक (वास्तुशिल्पकार) कुळगांव

विषय : स. नं. / 20 सि. स. न. — हि. नं. ९

प्लॉट नं. — मौजे कुळगांव येथे बांधकाम करण्याच्या मंजुरी बाबत.

संदर्भ : आपला दि. 30/3/९५ चा

श्री. सतीश ओक

वास्तु शिल्पकार यांचे मार्फत सादर केलेला अर्ज.

महाराष्ट्र प्रादेशिक व उपर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये

सि. स. न. — स. नं. 20 हि. नं.

९ प्लॉट नं. — मौजे कुळगांव मध्ये ५४६०.०० चौ. मि. भूखंडाच्या विकास करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दि. 30/3/९५ च्या अर्जास अनुसरून पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे तळमजला/स्टील, तळमजला पहिला मजला व दुसरा मजला तिसरा मजला, ~~चौथा मजला~~ रहाणेसाठी ~~दुकाने / ऑफिस / नगरखाना / सुरक्षित / खाजेसाठी / गॅरेज~~ यांचे भिंतीच्या इमारतीच्या बांधकामा बाबत, बांधकाम परवाना / प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे

: अटी :

१. ही बांधकाम परवानगी दिल्याचे तारखेपासून एक वर्ष पर्यंत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी परवानगीचे नूतनीकरण मुदत संपणे आधी करणे आवश्यक राहील. अशा प्रकारचे नूतनीकरण फक्त तीन वर्ष करता येईल. ह्या मुदतीत बांधकाम पूर्ण करणे आवश्यक आहे. नूतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमांच्या व नियोजित विकास आराखड्याच्या अनुषंगाने छाननी करण्यात येईल.

२. नकाशात — रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.

३. ह्या जिल्हाधिकारी ठाणे, यांजकडून बांधकाम चालू करावयाचे अगोदर बिनशेती परवानगी घेण्याची जबाबदारी तुमच्यावर राहील व बिन शेतीच्या परवानगीची एक सत्य प्रत काम सुरु करावयाचे पंधरा (१५) दिवस अगोदर नगरपालिकेकडे पाठविणे आवश्यक राहील.

४. बांधकाम चालू करण्यापूर्वी (७) दिवस आधी पालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

५. ही परवानगी आपल्या मालकाच्या कब्जातील जमिनी व्यतिरिक्त जमीनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.

६. बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशा प्रमाणे आणि घालून दिलेल्या अटीप्रमाणे करता येईल.

७. जोत्या पर्यंत बांधकाम झाल्यानंतर वास्तु शिल्पकाराचे मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र नगरपालिकेस सादर करण्यात यावे व त्या नंतरच जोत्यावरील बांधकाम करावे.

८. प्लॉटचे हद्दीत इमारती भोवती मोकळ्या सोडावयाच्या जागेत बदल करू नये. व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू नये.

९. बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करू नये: तसे केल्याचे आढळून आल्यास सदरची बांधकाम परवानगी रद्द झाली असे समजण्यात येईल.

१०. इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षितेची (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी आपल्या वास्तु शिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहील.